महावितरण (TM)
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
प्रकाशगड, ५ वा मजला, स्टेशन रोड, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१
दु.क्र.(ऑ.)२६४७४२११, २६४७२१३१ वि.क्र.३५०७ (वै.)२६४७४७५१ फॅक्स : ०२२.२६४७६२३३, २६४७२३१८

**क्र. मु.अ.(वा)/लेखा/ग्रा.पं.दिवाबत्ती/५५/२०११-१२/ 09718** **दिनांक :** 16 APR 2012

## परिपत्रक क्र. २५९

**विषय :-** ग्रामपंचायतीना रस्त्यावरील विजेच्या दिव्यांच्या वीज बिलांची रक्कम देण्यासाठी सन २०११-१२ या आर्थिक वर्षासाठी अनुदानापोटी मंजुर केलेली रक्कम रु. १७,८८,००,०००/- (रुपये सत्तरा कोटी अठ्ठयाऐंशी लाख फक्त)

**संदर्भ :-** १) शासन निर्णय क्र. बीजीटी-२६११/प्र.क्र.-१५७/पंरा-४ (२२) दि. १०.०८.२०११.
२) शासन निर्णय क्र. बीजीटी-२६११/प्र.क्र.-१५७/पंरा-४ (२२) दि.३१.०३.२०१२.

---

ग्रामपंचायतीच्या हद्दीतील रस्त्यावरील दिवाबत्तीची विज देयके भागविण्यासाठी शासन ग्रामपंचायतींना १०० टक्के अनुदान देते. सन २०११-१२ या आर्थिक वर्षात सदर अनुदानासाठी रक्कम रुपये ११९,२०,००,०००/- (रुपये एकशे एकोणीस कोटी वीस लाख फक्त) इतकी तरतुद शासकीय अर्थसंकल्पात करण्यात आलेली आहे, त्यापैकी रक्कम रुपये ८९,४०,००,०००/- (रुपये एकोणनव्वद कोटी चाळीस लाख फक्त) संदर्भाधीन(१) या शासन निर्णयानुसार देण्यात आले आहे. आता उर्वरित अनुदानापैकी रु. १७,८८,००,०००/- (रुपये सतरा कोटी अठ्ठयाऐंशी लाख फक्त). वरील संदर्भिय क्र.२ या शासन निर्णयासोबत जोडलेल्या जिल्हा निहाय विवरण पत्रात दर्शविल्याप्रमाणे शासनाकडून, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादितला रोखीत प्राप्त झाले आहेत.

शासन निर्णयासोबत जोडलेल्या जिल्हा निहाय विवरण पत्रातील रक्कमेचे, सबंधीत जिल्हयातील ग्रामपंचायतीच्या नावाने थकबाकीच्या प्रमाणात वर्ग करण्याबाबत संबंधितांनी जरुर ती कार्यवाही करावी.

थकबाकी पोटी समायोजित करण्यात आलेल्या रक्कमेचे (सन २०११-१२) ग्रामपंचायत निहाय विवरण पत्राची एक प्रत संबंधित जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, मुख्य लेखा वित्त अधिकारी तसेच विभागीय आयुक्त व उपसचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांच्यासह या कार्यालयास त्वरित पाठवावी.

**सोबत :** वरीलप्रमाणे

**मुख्य अभियंता (वाणिज्य)**

**प्रत सविनय सादर :-**
संचालक (वित्त), म.रा.वि.वि.कं. मर्यादित, प्रकाशगड, बांद्रा (पू), मुंबई.

**प्रत सस्नेह रवाना :-**
१. सर्व मुख्य अभियंते, म.रा.वि.वि.कं. मर्यादित, संवसु परिमंडळ कार्यालये, माहिती व उचित कार्यवाहसाठी
२. मुख्य महाव्यवस्थापक (निगम वित्त), म.रा.वि.वि.कं. मर्यादित, मुंबई.

**प्रत रवाना :**
१. सर्व अधिक्षक अभियंते, संवसु मंडळ कार्यालये, म.रा.वि.वि.कं. मर्यादित
२. महाव्यवस्थापक (अर्थोपाय विभाग), ३ रा मजला, हॉगकाँग इमारत, फोर्ट, मुंबई-४०० ००१.
३. सर्व कार्यकारी अभियंते, संवसु विभागीय कार्यालये, म.रा.वि.वि.कं. मर्यादित
४. सर्व उपकार्यकारी अभियंते / सहाय्यक अभियंते, संवसु उपविभागीय कार्यालये.

---- उचित कार्यवाहीसाठी.

अर्थसंकल्पीय अनुदान सन २०११-२०१२
३६०४ - स्थानिक संस्था व पंचायत राज संस्था यांना
नुकसान भरपाईच्या व अभिहस्तांकित रकमा देणे.
२०० इतर संकीर्ण नुकसान भरपाईच्या व अभिहस्तांकित
रकमा देणे (०१)(०३) रस्त्यावरील विजेच्या दिव्याची वीज
बिलांची रक्कम देण्यासाठी ग्राम पंचायतीना १०० %
अनुदान (३६०४०३२५) (दत्तमत)(मागणी क्र. एल -५)

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास व जलसंधारण विभाग,
शासन निर्णय क्र. बीजीटी २६११/प्र.क्र.१५७/पंरा-४(२२)
मंत्रालय, मुंबई - ४०००३२ दिनांक- ३१ मार्च,२०१२
संदर्भ :- शासन निर्णय समक्रमांक दिनांक १० ऑगस्ट, २०११

वाचा :-१) शासन निर्णय , ग्राम विकास विभाग क्र. व्हीपीएम २०८५/सीआर १९४०/२२ दि . ३०.१.९०

प्रस्तावना :-

ग्राम पंचायतीच्या हद्दीतील रस्त्यांवरील दिवाबत्तीची वीज देयके भागविण्यासाठी ग्रामपंचायतींना १०० टक्के अनुदान देण्यात येते. यासाठी सन २०११-२०१२ या आर्थिक वर्षात वित्त विभागाने एकूण रुपये ११९,२०,००,०००/- ( रुपये एकशे ऐकोणीस कोटी वीस लक्ष फक्त ) इतक्या रकमेची अर्थसंकल्पीय तरतूद केलेली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांची दिवाबत्तीची देयके त्वरित भागविण्यासाठी प्रशासकीय विभागांनी शासकीय अनुदानातून परस्पर सदर रक्कम महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाकडे भरणा करावी असा निर्णय शासनाने सन २००३ या वर्षी घेतलेला आहे.

शासन निर्णय :-

सन २०११-२०१२ या आर्थिक वर्षात सदर अनुदानासाठी रक्कम रुपये ११९,२०,००,०००/- ( रुपये एकशे ऐकोणीस कोटी वीस लक्ष फक्त ) इतकी तरतूद अर्थसंकल्पित करण्यांत आली आहे.

२. सदर तरतूदीतून संदर्भीय शासन निर्णयान्वये ग्रामपंचायतीमधील रस्त्यावरील विजेच्या दिव्याची वीज देयके अदा करण्यासाठी रक्कम रुपये ८९,४०,००,०००/- (रुपये एकोणनव्वद कोटी चाळीस लक्ष फक्त ) इतके अनुदान महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, मुंबई यांचेकडे रोखीने सुपूर्द करण्यात आले आहे. उर्वरीत अनुदानापैकी ९०% च्या मर्यादेत रक्कम रुपये १७८८.०० लक्ष (रुपये सतरा कोटी अठ्ठाऐंशी लक्ष फक्त) इतके अनुदान सोबतच्या विवरणपत्रात जिल्हानिहाय दर्शविलेल्या विगतवारीनुसार महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, मुंबई कडे सुपुर्द करण्याचा निर्णय शासनाने घेतला असून ती आता या शासन निर्णयाव्दारे कार्यासन अधिकारी, रोखशाखा, ग्राम विकास व जलसंधारण विभाग मंत्रालय, यांचे अधिनस्त ठेवण्यात येत आहे. सदरचा निधी अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई येथून आहरित करुन वितरित करण्यासाठी त्यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. त्यांनी उपरोक्त मंजूर करण्यात आलेल्या अनुदानाचा धनादेश महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, मुंबई यांच्या नावाने अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई येथून काढावयाचा आहे. श्री. वि.म. राउत, कार्यासन अधिकारी,

रोखशाखा यांच्या सहीने तयार केलेले व श्री. मो. का. भोये, उप सचिव (रोखशाखा ), ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी प्रतिस्वाक्षरीत केलेले देयक अधिदान व लेखाकार्यालय, मुंबई यांचेकडे सादर करण्यात यावे.

३. या करीता रक्कम रुपये १७८८.०० लक्ष (रुपये सतरा कोटी अठ्ठाऐंशी लक्ष फक्त) इतक्या अनुदानास मंजूरी देण्यात येत आहे. सदर अनुदान खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, मुंबई यांचेकडे सुपूर्द करण्यात येत आहे.

अ) महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित , मुंबई यांना दिलेल्या धनादेशाची रक्कम त्यांनी या शासन निर्णयासोबतच्या विवरण पत्रातील रकाना क्र. ३ मधील रक्कम त्या त्या जिल्हा परिषदांच्या अखत्यारीत असलेल्या ग्रामपंचायतीच्या रस्त्यावरील दिवाबत्तीच्या वीज देयकाच्या थकबाकीस अधीन राहून समायोजित करावी व तसा अहवाल शासनास सादर करावा .

ब ) समायोजित केलेल्या रक्कमेबाबतचे स्वतंत्र विवरणपत्र महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित , मुंबईने ठेवणे आवश्यक असून त्याची एक प्रत त्यांनी संबंधित जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी, मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांना पाठवावयाची आहे. तसेच त्याची एक प्रत शासनालाही पाठवावयाची आहे.

क) वरील अटींची पूर्तता होत आहे याची खात्री करुन घेण्यासाठी महालेखापाल, महाराष्ट्र -१ , मुंबई आणि महालेखापाल , महाराष्ट्र -२, नागपूर यांना लेखापरिक्षणाकरिता महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित , मुंबई यांची पुस्तके व लेखा पाहणीचा अधिकार राहील. महालेखापाल यांना त्यांचे काम पार पाडण्याकरीता महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित , मुंबई यांनी सर्वतोपरी सहकार्य दिले पाहिजे.

ड ) खर्चाचा मेळ घालण्यासाठी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित , मुंबई यांनी खर्चाची विवरणपत्रे विभागीय आयुक्तांना पाठवून त्याची एक प्रत शासनास पाटवावी.

४. विभागीय आयुक्तांनी शासन परिपत्रक ग्राम विकास विभाग क्र. आरसीएन१०८९/प्र.क्र. ३०२७/२८, दि. ५.९.९० मधील सूचनेप्रमाणे या अनुदानाच्या खर्चाचा महालेखापालांकडे नोंदलेल्या खर्चाबरोबर मेळ घालावा व अहवाल शासनाकडे पाठवावा.

५. उपरोक्त निधीबाबत नियंत्रक अधिकारी म्हणून उप सचिव, ग्राम विकास व जलसंधारण विभाग हे राहतील .

६. या शासन निर्णयाव्दारे मंजूर करण्यात आलेल्या अनुदानाएवढा खर्च "३६०४" स्थानिक संस्था व पंचायत राज संस्था यांना नुकसान भरपाईच्या व अभिहस्तांकित रकमा देणे. २०० इतर संकीर्ण नुकसानभरपाईच्या व अभिहस्तांकित रकमा देणे (०१)(०३) रस्त्यावरील विजेच्या दिव्यांची वीज बिलाची रक्कम देण्यासाठी ग्रामपंचायतींना १०० टक्के अनुदान देणे (३६०४०३२५) (दत्तमत)५० -इतर खर्च (मागणी क्र. एल ५) या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व तो उपरोक्त लेखाशिर्षाखाली सन २०११-२०१२ या आर्थिक वर्षासाठी असलेल्या अर्थसंकल्पिय तरतूदीतून भागविण्यात यावा.

७. हा शासन निर्णय वित्त विभागाचा अनौपचारीक संदर्भ क्रमांक १०२/१२ व्यय-१५ दि.१/३/२०१२ व अनौपचारीक संदर्भ क्रमांक ३३४/अर्थ -१७, दि.२९/३/२०१२ अन्वये करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(श.र.साबळे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परिक्षा) महाराष्ट्र-१, मुंबई -४०० ००१ वर नमूद केल्याप्रमाणे तीन प्रतीत माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी.( ३ प्रती ) प्रत माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी,

१) अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित , प्रकाशगड,वांद्रे (पूर्व), मुंबई -४०० ००५१ (५ प्रती)

२) व्यवस्थापकीय संचालक , महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित प्रकाशगड अनंत काणेकर मार्ग , वांद्रे ( पूर्व ) मुंबई.४०० ०५१.

३) मुख्य अभियंता ( वाणिज्य ) , महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित , प्रकाशगड (वाणिज्य विभाग ) ५ वा मजला , अनंत काणेकर मार्ग , वांद्रे ( पू ), मुंबई ४०० ०५१ (५ प्रती ) ४) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता ), महाराष्ट्र-१, मुंबई ४०० ००१

५) महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१, मुंबई ४०० ००१

६) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता ), महाराष्ट्र-२ , नागपूर .

७) महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-२, नागपूर

८).अधिदान व लेखा अधिकारी, महाराष्ट्र राज्य (अराप/रालेवि-१), मुंबई.

९) निवासी लेखा अधिकारी, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कपंनी मर्यादित , प्रकाशगड, वांद्रे (पूर्व), मुंबई.

१०) मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा , कोकण भवन , वाशी , नवी मुंबई

११) उप लेखा परिक्षक , नवी मुंबई , वाशी /पुणे/नाशिक/अमरावती/औरंगाबाद/नागपूर

१२) मुख्य अभियंता, विद्युत विभाग, महाराष्ट्र शासन , प्रशासकीय इमारत, ५९ रामकृष्ण चेंबूरकर मार्ग, चेंबूर , मुंबई ४०० ०७१

१३) अवर सचिव ( उर्जा -३ ) उद्योग उर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई -३२

१४) विभागीय आयुक्त (सर्व )

१५) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)

१६) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी.

१७) सर्व जिल्हा परिषदांचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत )

१८) कार्यासन अधिकारी, ग्राम विकास व जलसंधारणविभाग (वित्त -१, वित्त- ७, वित्त -८)

१९) कक्ष अधिकारी (रोखशाखा) ग्राम विकास व जलसंधारण विभाग,मंत्रालय, मुंबई.३२.

२०) वित्त विभाग (अर्थसंकल्प १७ / व्यय१५)मंत्रालय, मुंबई.३२.

२१) निवडनस्ती ,पंरा -४ ग्राम विकास व जलसंधारण विभाग.

# विवरणपत्र

शासन निर्णय क्र. , बीजीटी २६११/प्र.क्र. १५७/पंरा-४, दिनांक ३१ मार्च, २०१२ सोबतचे विवरणपत्र ३६०४ - स्थानिक संस्था व पंचायत राज संस्था यांना नुकसान भरपाईच्या व अभिहस्तांकित रकमा देणे. २००, इतर संकीर्ण नुकसान भरपाईच्या व अभिहस्तांकित रकमा देणे (०१) (०३) रस्त्यावरील विजेच्या दिव्याची वीज बिलांची रक्कम देण्यासाठी ग्राम पंचायतीना १०० %अनुदान (३६०४०३२५) (दत्तमत) ५० इतर खर्च (मागणी क्र. एल -५)

रोखीने (रु. लाखात)

| अ. क्र. | जिल्हा परिषद | रुपये अंकी | रुपये अक्षरी. |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | ठाणे | ५०.७५ | (रुपये पन्नास लक्ष पंच्याहत्तर हजार फक्त) |
| २ | रायगड | २१.१४ | (रुपये एकवीस लक्ष चौदा हजार फक्त) |
| ३ | रत्नागिरी | २५.६० | (रुपये पंचवीस लक्ष साठ हजार फक्त) |
| ४ | सिंधूदुर्ग | ११.४६ | (रुपये अकरा लक्ष शेहचाळीस हजार फक्त) |
| ५ | अहमदनगर | ५३.१५ | (रुपये त्रेपन्न लक्ष पंधरा हजार फक्त) |
| ६ | धुळे | २५.६४ | (रुपये पंचवीस लक्ष चौसष्ट हजार फक्त) |
| ७ | नंदूरबार | ६१.५४ | (रुपये एकसष्ट लक्ष चौपन्न हजार फक्त) |
| ८ | जळगांव | ६७.२५ | (रुपये सदुसष्ट लक्ष पंचवीस हजार फक्त) |
| ९ | नाशिक | ११३.०० | (रुपये एक कोटी तेरा लक्ष फक्त) |
| १० | कोल्हापूर | २६.१५ | (रुपये सव्वीस लक्ष पंधरा हजार फक्त) |
| ११ | सांगली | ३९.३६ | (रुपये एकोणचाळीस लक्ष छत्तीस हजार फक्त) |
| १२ | सातारा | ८०.३० | (रुपये ऐंशी लक्ष तीस हजार फक्त) |
| १३ | सोलापूर | ६७.१८ | (रुपये सदुसष्ट लक्ष अठरा हजार फक्त) |
| १४ | पुणे | ६६.९९ | (रुपये सहासष्ट लक्ष नव्यान्नव हजार फक्त) |
| १५ | औरंगाबाद | ६७.४४ | (रुपये सदुसष्ट लक्ष चव्वेचाळीस हजार फक्त) |
| १६ | जालना | ३८.५१ | (रुपये अडतीस लक्ष एक्कावन्न हजार फक्त) |
| १७ | परभणी | ८८.१९ | (रुपये अठ्ठाऐंशी लक्ष एकोणीस हजार फक्त) |
| १८ | हिंगोली | ४८.८७ | (रुपये अठ्ठेचाळीस लक्ष सत्याऐंशी हजार फक्त) |
| १९ | बीड | ८५.९१ | (रुपये पंच्याऐंशी लक्ष एक्यान्नव हजार फक्त) |
| २० | लातूर | ८७.३८ | (रुपये सत्याऐंशी लक्ष अडतीस हजार फक्त) |
| २१ | नांदेड | ११६.७९ | (रुपये एक कोटी सोळा लक्ष एकोणऐंशी हजार फक्त) |
| २२ | उस्मानाबाद | ४०.६४ | (रुपये चाळीस लक्ष चौसष्ट हजार फक्त) |
| २३ | अकोला | ३१.१० | (रुपये एकतीस लक्ष दहा हजार फक्त) |

| | | | |
|---|---|---|---|
| २४ | वाशिम | २०.९० | (रुपये वीस लक्ष नव्वद हजार फक्त ) |
| २५ | अमरावती | ५०.४१ | (रुपये पन्नास लक्ष एक्केचाळीस हजार फक्त ) |
| २६ | बुलढाणा | ६३.०५ | (रुपये त्रेसष्ट लक्ष पाच हजार फक्त ) |
| २७ | यवतमाळ | ७९.६३ | (रुपये एकोणऐंशी लक्ष त्रेसष्ट हजार फक्त ) |
| २८ | भंडारा | २४.७९ | (रुपये चोवीस लक्ष एकोणऐंशी हजार फक्त ) |
| २९ | गोंदिया | १२.८४ | (रुपये बारा लक्ष चौऱ्याऐंशी हजार फक्त ) |
| ३० | चंद्रपूर | ५२.७४ | (रुपये बावन्न लक्ष चौऱ्याहत्तर हजार फक्त ) |
| ३१ | गडचिरोली | ६०.३५ | (रुपये साठ लक्ष पस्तीस हजार फक्त ) |
| ३२ | वर्धा | ४४.२२ | (रुपये चव्वेचाळीस लक्ष बावीस हजार फक्त ) |
| ३३ | नागपूर | ६४.७३ | (रुपये चौसष्ट लक्ष त्र्याहत्तर हजार फक्त ) |
| | एकूण | १७८८.०० | (रुपये सतरा कोटी अठ्ठाऐंशी लक्ष फक्त ) |

(श.र. साबळे)

कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन